# घटक : १ मराठी भाषेचा ध्वनिविचार

## अनुक्रमणिका :


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ महत्त्वाचे पारिभाषिक शब्द
१.३ ध्वनिविचार : विवेचन
  १.३.१ भाषाविषयक उताऱ्याचे अध्ययन
  १.३.२ मराठीची वर्णमाला
  १.३.३ मराठीची स्वरमाला
  १.३.४ स्वरांचे वर्गीकरण (स्थानावरून)
  १.३.५ स्वरांचे वर्गीकरण (ओठांच्या स्थितीवरून)
  १.३.६ व्यंजन म्हणजे काय?
  १.३.७ मराठीतील व्यंजने
  १.३.८ व्यंजनांचे वर्गीकरण
  १.३.९ उच्चारणस्थानानुसार वर्गीकरण
  १.३.१० प्रयत्नानुसार वर्गीकरण
१.४ नमुना उत्तरे
१.५ अधिक अध्ययन
१.६ सारांश
१.७ सरावासाठी स्वाध्याय
१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

मराठी भाषेची ठळक वैशिष्ट तुम्हाला घटक १ ते ४ मध्ये अभ्यासावयाची आहेत.

या घटकाचे नीट अध्ययन केल्यावर

०.१ भाषेचे मानवी जीवनातील महत्त्व तुम्हांला सांगता येईल.
०.२ मराठी भाषेचा तुम्हांला थोडक्यात परिचय होईल.
०.३ मराठीच्या ध्वनिव्यवस्थेचे स्वरूप तुम्हांस समजेल.
०.४ मराठीची स्वरमाला व स्वरांचे वर्गीकरण यांची माहिती तुम्हांस होईल.
०.५ मराठीची व्यंजनमाला व व्यंजनांचे वर्गीकरण यांची माहिती तुम्हांस होईल.
०.६ मराठीतील प्रत्येक ध्वनीचे वेगळेपण जाणण्याचा सराव तुम्हांस करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये देवाणघेवाण, विचारविनिमय किंवा संज्ञापन करण्याचे कार्य करणारी भाषा ही एक प्रमुख सामाजिक संस्था आहे. भाषेमुळेच माणसाला या जगात व्यवहार करणे शक्य होते. भाषा हे साधन असल्यामुळेच प्रत्येकजण स्वतःला प्रकट करू शकतो किंवा दुसऱ्याच्या कल्पना, भावना, विचार समजावून घेऊ शकतो. भाषा नसती तर मानवी जीवनात पदोपदी अडचण निर्माण झाली असती. पशुपक्ष्यांप्रमाणे मुखावाटे ध्वनी निर्माण करण्याचे सामर्थ्य माणसाला जन्मतःच लाभलेले असते. पण ध्वनींचे आपल्या इच्छेनुसार नियोजन करून त्याला अर्थपूर्ण स्वरूप देण्याचे सामर्थ्य फक्त मानवानेच साध्य केले आहे. म्हणूनच 'बोलणारा प्राणी म्हणजे माणूस' अशीही माणसाची व्याख्या केली जाते. भाषा ही एकाच वेळी व्यक्तीची असते तशी ती समूहाची असते. जगाच्या पाठीवर जितके मानवसमूह आहेत तितक्या विविध भाषा आहेत. प्रत्येक व्यक्ती कोणत्या तरी मानवसमूहाचा घटक असल्यामुळे आपल्याला जन्मतःच एक स्वभाषा प्राप्त झालेली असते.

## १.२ महत्त्वाचे पारिभाषिक शब्द

**मातृभाषा** : जन्मभाषा किंवा स्वभाषा या अर्थानेही हा शब्द वापरला जातो.

**मानस्वर** : कोणत्याही भाषेत सर्वत्र उच्चारल्या जाणाऱ्या मुख्य स्वरांना 'मान-स्वर' (Standard Vowels) असे म्हणातात.

**महाप्राण व्यंजने** : उच्चारणास हवा अधिक प्रमाणात लागते अशा व्यंजनांना महाप्राण व्यंजने म्हणतात

**अल्पप्राण व्यंजने** : ज्यांच्या उच्चारणात हवा कमी लागते त्यांना अल्पप्राण व्यंजने म्हणतात.

**बोली** : जी विशिष्ट भाषिक समाजाच्या एकूण क्षेत्रांपैकी मर्यादित क्षेत्रात बोलली जाते किंवा मर्यादित गटांकडून बोलली जाते मात्र जी विशिष्ट कारणापुरतीच वापरली जाते तिला बोली म्हणतात.

**घोष** : फुफ्फुसातील हवा श्वासनलिकामार्गे कंठाशी असलेल्या स्वरतंत्रीमधून घशाकडे जात असताना स्वरतंत्रीमधील सूक्ष्म तंतूंचे कंपन होऊन अशी कंपनयुक्त हवा बाहेर पडल्यामुळे जे उच्चारण होते त्यास घोष ध्वनी म्हणतात.

**अघोष** : वरीलप्रमाणे हवा बाहेर पडताना स्वरतंत्रीमध्ये तंतूंचे कंपन न होता ती बाहेर पडते तेव्हा निर्माण होणाऱ्या ध्वनींना अघोष म्हणतात.

**स्पर्श व्यंजने** : मुखावाटे हवा बाहेर पडताना कंठद्वारापासून ओठांपर्यन्त कोठे ना कोठे ती क्षणमात्र अडवली जाऊन एकदम सोडली जाते अशा वेळी निर्माण होणाऱ्या व्यंजनांना स्पर्श व्यंजने म्हणतात.

**संघर्षी व्यंजने** : हवा मुखावाटे बाहेर पडताना तिला अत्यंत अरुंद फटीतून घासत जावे लागते तेव्हा निर्माण होणाऱ्या व्यंजनांना संघर्षी व्यंजने म्हणतात.

**स्पर्श संघर्षी व्यंजने** : हवा अडवून एकदम सोडणे व ती घासत बाहेर पडणे या दोन क्रिया एकाच वेळी झाल्याने निर्माण होणाऱ्या व्यंजनांना स्पर्श संघर्षी व्यंजने म्हणतात.

**अर्धस्वर** :स्वर आणि व्यंजन या दोहोंचे विशेष असलेल्या ध्वनींना अर्धस्वर म्हणतात.

**पार्श्विक व्यंजने** : हवा मुखावाटे बाहेर पडताना जीभ उचलली व आत वळवली गेल्याने जी व्यंजने निर्माण होतात त्यांना पार्श्विक व्यंजने म्हणतात.

## १.३ ध्वनिविचार : विवेचन

### १.३.१ भाषाविषयक उताऱ्याचे अध्ययन

"जन्मभाषा किंवा स्वभाषा या अर्थाने 'मातृभाषा' हा शब्द वापरला जातो. मराठी आपली मातृभाषा आहे. जन्म देणाऱ्या आईसारखेच आपल्या जन्मभाषेचेही आपल्यावर अपार ऋण असते. आईप्रमाणे भाषाही आपल्याला घडवते, आपल्यावर संस्कार करते, आपल्या भावनांचे आणि विचारांचे पोषण करते आणि आपल्या संस्कृतीचा ठेवा आपल्या हवाली करते. आपल्याला जगाची ओळख होते ती आपल्या भाषेमुळेच आणि या अफाट जगात आपल्याला वेगळेपण प्राप्त होते तेही आपल्या भाषेमुळेच. महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर, आणि देशोदेशी विखुरलेल्या स्थितीत कुठेही असलो तरी आपण 'मराठी माणसे' असतो. आपला धर्म, जात, पंथ, वेष कोणताही असेल पण आपण 'मराठी' आहो. भाषेवरून मिळालेले हे विशेषण आपली जन्मभर साथ करीत असते. या मराठीचा आपल्याला अभिमान वाटतो. आपल्या हातून मराठीची काही सेवा घडावी अशी आपली धडपड असते. आपल्या मराठीचा कुणी अपमान केला, तिच्यावर कुणी अन्याय केला, तर आपण पेटून उठतो.

आपल्या भाषेचा आपल्याला जरूर अभिमान वाटला पाहिजे. मात्र दुसऱ्या कोणत्याही भाषेचा आपण द्वेष करता कामा नये. भारतासारख्या बहुभाषक देशात विविध भाषा बोलणाऱ्यांमध्ये स्नेहभाव असण्याची फार गरज आहे.

मराठी भाषा हजार-बाराशे वर्षांइतकी जुनी निश्चितच आहे. 'चावुण्डराये करवियलें' हा मराठीतला आद्य कोरीव लेख शके ९०५ म्हणजे इसवी सन ९८३ मधला आहे. या उपलब्ध पहिल्या लेखाला हजार वर्षे होऊन गेली. प्राकृत, देशी, नागर अशा वेगवेगळ्या नावांनी ही भाषा आधी ओळखली जात होती. पण यादवकाळापासून तिला 'मऱ्हाटी' हे नाव प्राप्त झाले. 'इये मऱ्हाटीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळु करी' ही ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा प्रसिद्धच आहे. 'मऱ्हाटी' म्हणजे साधीसरळ, भोळी-भाबडी, रोखठोक, सहजसुंदर. 'मऱ्हाटी' या शब्दातून भाषेप्रमाणे इथल्या माणसांच्या स्वभावाचीही सूचना मिळते. या 'मऱ्हाटी' चेच किंचित बदललेले रूप म्हणजे 'मराठी.'

या हजार-बाराशे वर्षांत मराठीला अनेक अवस्थांमधून जावे लागले आहे. महाराष्ट्राच्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय संस्कृतींचा संगम महाराष्ट्रात झालेला दिसतो. मराठी भाषेबद्दलही हेच दिसते. मराठी ही संस्कृत परंपरेतली भाषा असली तरी तिने द्राविड भाषांचेही काही विशेष स्वीकारले आहेत. मराठीतला 'ळ' ही त्याची ठळक खूण म्हणता येईल. कन्नड, तेलगू आणि तमिळ या भाषांमधले अनेक शब्द घेऊनच मराठीची घडण झाली आहे. गुजराती आणि हिन्दी या तर मराठीच्या जवळच्या भाषाभगिनी. या तीन भाषांमध्ये अनेक बाबतींत सारखेपणा आहे. संस्कृत परंपरेतली भाषा असल्यामुळे मराठीने संस्कृतचा अनेक बाबतीत आधार घ्यावा हे स्वाभाविकच आहे. पण आपले मराठीपण टिकविण्यासाठी तिला अनेकदा संस्कृतवर्चस्वाला विरोधही करावा लागला आहे. चक्रधर, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, श्रीधर, जोतिबा फुले यांसारख्या अनेकांनी संस्कृतचे वर्चस्व झुगारून देऊनच मराठीला तिचे वेगळेपण मिळवून दिले आहे. तुकाराम म्हणजे तर मराठमोळ्या भाषेचा आदर्शच. मात्र मराठीचे संस्कृतशी भांडण नाही. आजही शेकडो नवीन शब्द संस्कृतच्या आधारानेच मराठीत निर्माण होत असतात. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात तर संस्कृतचा आश्रय घेणे अटळ आहे. चौदाव्या शतकापासून अरबी-फारसी या भाषांचा संबंध आल्यामुळे आणि तो दीर्घकाळ टिकल्यामुळे मराठीने या दोन भाषांमधले शेकडो शब्द आणि काही थोडे व्याकरणविशेष स्वीकारले आहेत, एवढेच नव्हे तर ते पचविलेही आहेत. आपल्या रोजच्या बोलण्यात शेकडो शब्द अरबी-फारसी भाषांमधले आहेत याची आपल्याला जाणीवही नसते. गेल्या दोन शतकांत जीवनाच्या बहुतेक क्षेत्रात इंग्रजीचा प्रवेश झाला आहे. शिक्षणाचे माध्यम, शासनव्यवहार, न्यायदान, प्रसारमाध्यमे, उद्योगव्यवसाय, दळणवळण यांसारख्या अनेक क्षेत्रांत इंग्रजीचा दबदबा टिकून आहे. आजच्या शिक्षित समाजाची बोलण्याची भाषा तर अर्ध-मराठी, अर्ध-इंग्रजी अशीच बनली आहे. मात्र इंग्रजीच्या संपन्नतेचा लाभ करून घेताना मराठीचे स्वत्व कसे टिकून राहील हे पाहण्याची फार गरज आहे.

मराठी भाषा महाराष्ट्राप्रमाणे महाराष्ट्राबाहेरही अनेक ठिकाणी बोलली जाते. मध्यप्रदेश आणि राजस्थानच्या खालोखाल महाराष्ट्राचे क्षेत्रफळ भारतात तिसऱ्या क्रमांकाचे आहे. हिन्दी आणि तेलगू भाषिकांच्या खालोखाल मराठी भाषिकांची संख्याही देशात तिसऱ्या क्रमांकाची आहे. तीस जिल्ह्यांच्या विस्तीर्ण भूप्रदेशात आणि पाच-सहा कोटींच्या जवळपास असलेल्या मराठी भाषिकांची मराठी भाषा सर्वत्र सारखी असणे शक्य नाही. त्यामुळेच विविध जिल्ह्यांमध्ये मराठी बोलण्याच्या अनेक लकबी दिसून येतात. उत्तर कोकण, मध्य कोकण, दक्षिण कोकण, मुंबई, खानदेश, विदर्भ, नागपूर, मराठवाडा, पूर्व महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्र या सर्व ठिकाणी मराठी भाषा बोलण्याचा ढंग थोडाफार वेगळा आहे असे जाणवते. कोकणी, आहिराणी, वऱ्हाडी ही मराठीची खास जाणवण्यासारखी भिन्न रूपे आहेत. ठाणे आणि धुळे जिल्ह्यांत गुजरातीच्या साहचर्यामुळे, जळगावपासून भंडाऱ्यापर्यंत हिन्दीच्या निकटत्वामुळे तिथल्या मराठी माणसांच्या बोलण्याच्या पद्धतीवर काही परिणाम झालेला दिसून येतो. चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि नांदेड जिल्ह्यांतल्या मराठीची तेलगूशी बरीच जवळीक आहे. तर लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतल्या मराठीवर कन्नड भाषेच्या सान्निध्यामुळे काही परिणाम झालेला दिसून येतो. त्या त्या ठिकाणचे मराठी उच्चारण किंचित वेगळे जाणवले तरी मराठी भाषिकांची सर्वसाधारण व्यवहाराची, शिक्षणाची, शासनाची आणि लेखनाची भाषा एकच आहे. ही प्रमाण मराठी भाषाच आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथलेखन,

शिक्षण आणि सभासंमेलने या ठिकाणी वावरत असते. त्यामुळे ती सर्व ठिकाणच्या मराठी भाषिकांना समजते, तिच्यात ते व्यवहार करीत असतात. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू येथे मराठी भाषिकांची अनेक बेटे बनली आहेत. त्या त्या प्रदेशातल्या भाषेचे मराठीवर तेथे वर्चस्व असणे स्वाभाविक आहे. पण तरीही या सर्व ठिकाणच्या मराठी भाषिकांनी आपली भाषा जतन केली आहे. इतकेच काय, मॉरिशस सारख्या पाच हजार मैलांवरच्या बेटातही मराठी भाषा आणि संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी तिथल्या मराठी भाषिकांचे आटोकाट प्रयत्न चालले आहेत.

महाराष्ट्रात अमराठी भाषिकांचे प्रमाण जाणवण्याइतके मोठे आहे. नोकरीधंद्यामुळे आणि औद्योगिकीकरणामुळे हे प्रमाण गेल्या चाळीस-पन्नास वर्षांमध्ये सतत वाढतच आहे. आपली जन्मभाषा असल्यामुळे मराठी आपल्याला सहज सोपी वाटत असली तरी अमराठी भाषिकांच्या दृष्टीने ती फार कठीण आणि गुंतागुंतीची आहे. 'चमचा' आणि 'चहा' यातला वेगळा 'च', 'जग' आणि 'ज' (क्रियापद) यातला 'वेगळा' जग उच्चारणे अमराठी माणसाला जड जाते. हिन्दीसारख्या भाषेत नपुंसकलिंग नाही. मराठीची लिंगव्यवस्था फार अनियमित आहे. त्यामुळे प्रत्येक नामाचे सहजलिंग लक्षात ठेवणे अमराठी माणसाला कठीण वाटते. विभक्तीप्रत्यय लागताना होणारे सामान्यरूप, शब्दांचे अवयव, शब्दातील आघाताच्या जागा, वाक्यरचनेतला शब्दांचा क्रम आणि वाक्याचे प्रयोग, विशेषतः त्यातले कर्मणी प्रयोगाचे आधिक्य या सर्व गोष्टींमुळे अमराठी माणसाला मराठी ही कठीण भाषा वाटते. खरे म्हणजे, प्रत्येक भाषेची खास अशी वैशिष्ट्ये असतातच.

गेल्या सात-आठशे वर्षांत वेगवेगळया प्रकारच्या साहित्यामुळे मराठी भाषा अतिशय संपन्न झाली आहे. ज्ञानोबांपासून विनोबांपर्यंत मराठी साहित्याची मोठी परंपरा आहे. काव्य, नाटक, कथा-कादंबरी, निबंध, वैचारिक गद्य, कोशवाङ्मय, चरित्र, आत्मचरित्र या सर्व प्रकारांत मराठीने पुष्कळ काही साध्य केले आहे. मात्र अजून करण्यासारखे पुष्कळ काही आहे. मराठीचा वापर ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात वाढण्याची फार आवश्यकता आहे. तंत्रविज्ञानाच्या आणि संगणकाच्या युगात मराठी भाषा सर्व आव्हाने पेलू शकेल असे बळ तिला प्राप्त करून दिले पाहिजे''

उताऱ्यातील प्रमुख मुद्यांची चर्चा अशी करता येईल.

(१) आई प्रमाणे मातृभाषा आपले संगोपन-संवर्धन करते. आपल्यावर संस्कार करते. आपण आपल्या भाषेमुळेच दुसऱ्याशी व्यवहार करायला पात्र ठरतो. आईप्रमाणेच भाषा आपणांस अशी घडवत असल्यामुळे तिचे आपल्यावर ऋण असते.

(२) चक्रधर, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास इत्यादी प्राचीन काळांतील थोर पुरुषांनी तसेच ज्योतिबा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, माधव जूलियन (पटवर्धन) यांसारख्या अर्वाचीन काळातील लेखकांनी व कार्यकर्त्यांनी मराठी बद्दलचा अभिमान प्रकट केला आहे.

(३) शासनव्यवहारात व ज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन पारिभाषिक संज्ञा तयार करायला आजही संस्कृतचा उपयोग होत असतो. उपसर्ग (पूर्वप्रत्यय) आणि साधकप्रत्यय यांच्या साहाय्याने नवीन शब्द घडविण्याची क्षमता संस्कृतमध्ये फार मोठी आहे. उदा. युज म्हणजे जोडणे या धातूपासून 'योग' हे नाम बनते. या 'योग'ला उपसर्ग लावून वियोग, संयोग, प्रयोग, आयोग, सुयोग यासारखे अनेक शब्द बनविता येतात.

(४) चौदाव्या शतकापासून इस्लामी राजवटीमुळे अरबी-फारसी भाषांचा मराठीशी संबंध आला. पंधराव्या शतकापासून गोव्यातील राजकीय घडामोडींमुळे पोर्तुगीज भाषेचा मराठीशी संबंध आला तर एकोणिसाव्या शतकापासून शिक्षण, ज्ञानविज्ञान, ग्रंथव्यवहार, भौतिक सुधारणा, शासनव्यवहार, प्रसारमाध्यमे, वाहतूक आणि न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांतील वर्चस्वामुळे मराठी भाषा इंग्रजीमुळे प्रभावित झाली आहे.

(५) गुजराती आणि हिन्दी या महाराष्ट्राच्या अनुक्रमे वायव्य आणि उत्तर भागाला भिडलेल्या शेजारभाषा आहेत, तर कन्नड ही महाराष्ट्राच्या दक्षिणेला व तेलगू ही महाराष्ट्राच्या पूर्वेला तशीच आग्नेयेस असलेली शेजारभाषा आहे.

(६) मराठी भाषा तीस जिल्ह्यांइतका विस्तृत भूभाग असलेल्या महाराष्ट्रात बोलली जाते. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण असे महाराष्ट्राचे स्वाभाविक विभाग पडतात. या विभागांमध्ये राजकीय-सामाजिक घडामोडी वेगवेगळया झाल्या आहेत. प्रत्येक विभागाच्या काही परंपरा निर्माण झाल्या आहेत. यामुळे या सर्व क्षेत्रांत मराठी भाषा बोलण्याचे ढंग थोडे-फार वेगळे दिसून येतात.

(७) अहिराणी बोली प्रामुख्याने धुळे, जळगांव आणि नाशिक जिल्ह्याच्या काही भागात बोलली जाते. वऱ्हाडी बोलीचे क्षेत्र बुलढाणा, अकोला, अमरावती आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आहे तर माणदेशी बोली माण नदीच्या परिसरात म्हणजे सातारा, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये बोलली जाते.

(८) 'च' (चरणे) 'ज' (जहाज) 'झ' (झरा) यांसारखे दंतमूलीय उच्चार नीटपणे करणे अमराठी माणसाला जमत नाही. मराठीतील 'ळ' चा उच्चार ही उत्तरेकडच्या अनेक भाषकांना करता येत नाही. मराठीच्या लिंगव्यवस्थेमधील अनियमितपणा ही अमराठी माणसाच्या लक्षात लवकर येत नाही. विशेषतः प्रत्येक वस्तूच्या शब्दोच्चाराबरोबर

पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग यांपैकी एका लिंगाची योजनाही अंतर्भूत असते. हे सहजलिंग. प्रयत्नपूर्वकच लक्षात ठेवावे लागते. ज्या भाषांमध्ये नपुंसकलिंग नाही त्यांच्या हातूनही मराठीत बोलताना चुका होतात. विभक्तिप्रत्यय लागताना कोणत्या नामाचे होणारे (किंवा न होणारे) सामान्यरूपही अमराठी माणसास अवघड ठरू शकते. मराठी वाक्यरचनेत कर्तरी प्रयोगापेक्षा कर्मणी प्रयोगाचे अधिक्य असते याचे आकलन करणे विशेषतः द्राविड भाषकांना जड जाते.

(९) मराठीमध्ये ग्रंथरचनेला प्रारंभ ज्ञानेश्वर-नामदेवांच्या काळापासून झाला असे म्हणता येते. प्राचीन काळातील या दोन संतांखेरीज एकनाथ, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर, वामनपंडित, श्रीधर, मोरोपंत यांसारख्या अनेक कवींनी आणि महानुभाव पंथातील म्हाइंभट, भास्करभट बोरीकर, नरेन्द्र पंडित इत्यादी अनेक ग्रंथकारांनी मराठी भाषेला मोठे वैभव प्राप्त करून दिले. अर्वाचीन काळात तर फुले-चिपळूणकर यांच्या काळापासून आजपर्यन्त शेकडो लेखक-लेखिकांनी मराठीच्या वैभवात भर घातली आहे.

(१०) मराठीचा पुष्कळ बाबतीत विकास झाला असला तरी ज्ञान–विज्ञानाच्या क्षेत्रात तिच्या प्रगतीला पुष्कळ वाव आहे. भौतिक आणि सामाजिक शास्त्रे, तंत्रविज्ञान या बाबतीत मराठीचा म्हणण्यासारखा वापर होत नाही. व्यापार-उद्योगाच्या क्षेत्रातही मराठीचे अस्तित्व जाणवत नाही. कायदा, न्याय या संदर्भातही मराठी अल्प प्रमाणातच दिसून येते. जीवनाच्या सर्व क्षेत्रात मराठीला सन्मानाचे स्थान प्राप्त होण्यासाठी तिच्या चहुमुखी विकासाची आवश्यकता आहे.

### १.३.२ मराठीची वर्णमाला

गेल्या हजार वर्षांमध्ये मराठी भाषेची वाटचाल कशी झाली आणि तिच्यात काळानुसार कोणते बदल झाले याची थोडक्यात माहिती करून घेतल्यानंतर आता आपल्याला आजच्या म्हणजे वर्तमान मराठीचा विस्तृत आणि सर्वांगीण परिचय करून घ्यायचा आहे.

कोणतीही भाषा बोलली जाते म्हणजे तोंडावाटे अनेक ध्वनींचा उच्चार केला जातो. तसे पाहिले तर, माणूस तोंडावाटे तऱ्हेतऱ्हेचे अगणित ध्वनी उच्चारू शकतो. शिंक, जांभई, उचकी, ढेकर यांसारख्या शारीरिक क्रिया करतानाही ध्वनी निर्माण होत असतो. आणि हसणे, रडणे, किंचाळणे, शीळ घालणे अशा प्रकारेही अनेक ध्वनी निर्माण करता येतात. पण या ध्वनींचा उपयोग भाषेत होत नाही. ज्यांच्या आधाराने शब्द उच्चारता येतात अशा ध्वनींनाच 'भाषाध्वनी' किंवा 'वर्ण' म्हणतात. प्रत्येक भाषेतील ध्वनिव्यवस्था किंवा वर्णमाला वेगळी असते. वर्णांना किंवा भाषाध्वनींना लेखनचिन्ह दिले जाते. त्यामुळे प्रत्येक भाषेची स्वतःची लेखनपद्धती असते. मराठीच्या ध्वनिव्यवस्थेचा म्हणजेच वर्णमालेचा आता आपणांस परिचय करून घ्यायचा आहे.

### १.३.३ मराठीची स्वरमाला

कोणत्याही भाषेतील ध्वनींची 'स्वर' आणि 'व्यंजन' अशी विभागणी केली जाते.

जे उच्चारण स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण असते त्यास स्वर म्हणतात. स्वरांचे उच्चारण अखंड आणि कमी किंवा अधिक कालावधीचे करता येते. सर्व स्वर नाद किंवा 'घोष' (म्हणजे स्वरयंत्रात कंपन होऊन निर्माण झालेले असे) असतात.

कोणत्याही भाषेत सर्वत्र उच्चारल्या जाणाऱ्या मुख्य स्वरांना 'मान-स्वर' (Standard Vowels) असे म्हणतात.

मराठीतील मान-स्वर खालील प्रमाणे आहेत अ, आ, इ, उ, ए , ओ, ॲ, ऑ.

यांतील प्रत्येक स्वराचा ह्रस्व (म्हणजे कमी कालावधीचा) आणि दीर्घ (म्हणजे अधिक कालावधीचा) असा उच्चार होऊ शकतो. त्यामुळे केवळ 'ई' आणि 'ऊ' हेच काय ते दीर्घ स्वर असे समजण्याचे कारण नाही.

'ऐ' (उच्चार : अइ) आणि 'औ' (उच्चार : अउ) हे स्वतंत्र स्वर नसून ते संयुक्त स्वर आहेत. त्यांना लेखनचिन्ह वेगळे आहे इतकेच.

'ऋ' हा स्वर मराठीत काही संस्कृत शब्दांपुरता येतो. उदा 'ऋण', ऋषी, हृदय. मराठी माणसे या ऋ चा उच्चार बहुधा 'रि' किंवा 'रु' असा करतात उदाः कृष्ण-क्रिष्ण, कृपा-क्रूपा, ऋण-रीण, हृदय-ह्रिदय इ.

अं आणि अः यांना लेखनात स्वतंत्र चिन्ह असले तरी ते काही स्वतंत्र स्वर नव्हेत त्यांना 'स्वरादी' असे म्हटले जाते. इं (बिंब =ब +इ +म् +ब) इः (निःपात = न् + इ + :(ह) + प् + आ + त) याप्रमाणे अन्य स्वरांच्या बाबतीतही स्वरादी हा प्रकार आढळतो.

### १.३.४ स्वरांचे वर्गीकरण (स्थानावरून)

मराठीत स्वर कोणकोणते आहेत ते पाहिल्यावर आता त्यांचे वर्गीकरण कसे करता येते ते पाहू.

(अ) मुखाच्या पोकळीचे पुढून मागे या क्रमाने तीन भाग मानले जातात. पुढच्या भागास 'अग्र', मधल्या भागास 'केन्द्र' व मागच्या भागास 'पश्च' अशी नावे आहेत.

(आ) मुखाच्या पोकळीचे वरून खाली या क्रमानेही तीन भाग मानले जातात. वरच्या भागास 'ऊर्ध्व' मधल्या भागास 'मध्य' व खालच्या भागास 'निम्न' अशी नावे आहेत.

(इ) 'इ, ए, अ‍ॅ' हे स्वर मुखाच्या पुढील म्हणजे अग्र भागात उच्चारले जातात.

(ई) 'ऋ, अ, आ' हे स्वर मुखाच्या केन्द्र भागात उच्चारले जातात.

(उ) 'उ, ओ, ऑ' हे स्वर मुखाच्या पश्च म्हणजे भागील भागात उच्चारले जातात.

(ऊ) 'इ, ऋ, उ' हे स्वर मुखाच्या पोकळीच्या वरच्या म्हणजे ऊर्ध्व भागात उच्चारले जातात.

(ए) 'ए, अ, ओ' हे स्वर मुखाच्या पोकळीच्या मध्य भागात उच्चारले जातात.

(ऐ) 'अ‍ॅ, आ, ऑ' हे स्वर मुखाच्या पोकळीचा खालच्या म्हणजे निम्न भागात उच्चारले जातात.

### १.३.५ स्वरांचे वर्गीकरण (ओठांच्या स्थितीवरून)

(अ) ओठ आडवे ताणणे, स्वाभाविक स्थितीत उघडणे आणि चंबूच्या आकारात उघडणे अशा तीन प्रकारच्या हालचाली स्वरांचा उच्चार करताना होत असतात.

(आ) 'इ, ए, अ‍ॅ', हे अग्रस्थानीचे स्वर उच्चारले जाताना ओठ आडवे ताणले जातात.

(इ) 'ऋ, अ, आ,' हे केन्द्र स्वर उच्चारले जाताना ओठ स्वाभाविक स्थितीत उघडले जातात.

(ई) 'उ, ओ, ऑ', हे पश्च स्वर उच्चारले जाताना ओठ चंबूच्या आकारात उघडले जातात.

मुखाच्या पोकळीत प्रत्येक स्वर कोठे उच्चारला जातो आणि त्या वेळी ओठांची हालचाल कशी होते हे खालील आकृतीवरूनही स्पष्ट करता येते.

| | अग्र | केन्द्र | पश्च |
|---|---|---|---|
| ऊर्ध्व | इ | ऋ * | उ |
| मध्य | ए | अ | ओ |
| निम्न | अ‍ॅ | आ | ऑ |

'ऋ' हा स्वर मराठीत फक्त संस्कृत शब्दांपुरता येत असल्यामुळे आणि त्यातही त्याचे उच्चारण 'रि' किंवा 'रु' सारखे केले जात असल्यामुळे 'ऋ' ला स्वतंत्र स्वर मानावे की नाही याबद्दल वाद आहे. 'ऋ' चे स्वरत्व मराठीत शंकास्पद आहे हे दाखविण्यासाठी ऋ * असे लेखन केले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**(क) स्वर म्हणजे काय? स्वराच्या कसोटया कोणत्या?**

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

(ख) मराठीत 'ऋ' हा स्वतंत्र स्वर मानण्याचे कारण का दिसत नाही?

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

(ग) खालील शब्दांमध्ये 'ऋ' चा उच्चार कसा होतो?

| गृहस्थ | गुहस्थ | ग्रिहस्थ |
|---|---|---|
| मातृकृपा | | |
| हृदय | | |
| कृष्ण | | |
| ऋण | | |

(घ) संयुक्त स्वर म्हणजे काय?

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

(ङ) मानस्वर म्हणजे काय?

.............................................................................................

.............................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

### १.३.६ व्यंजन म्हणजे काय ?

स्वर म्हणजे काय, स्वरांचे उच्चारण कोठे, कसे होते आणि स्वरांचे वर्गीकरण कसे केले जाते ही माहिती घेतल्यावर आता व्यंजनांचा विचार करू.

ज्या भाषाध्वनींचा उच्चार स्वरांच्या साहाय्याशिवाय होऊ शकत नाही त्यांना व्यंजने म्हणतात. व्यंजनाचा उच्चार अखंड करता येत नाही. कोणत्या ना कोणत्या प्रकारचा अडथळा मुखमार्गात निर्माण होऊनच व्यंजन उच्चारले जाते.

मुखावाटे हवा बाहेर पडताना ती कोठे अडविली गेली किंवा घासली गेली ; तसेच हवा अधिक प्रमाणात वापरली गेली का कमी प्रमाणात, स्वरयंत्रात कंपन झाले की झाले नाही यामुळे व्यंजनांचे विविध प्रकार पडतात.

मराठीत एकूण खालील प्रमाणे व्यंजने आहेत.

क्, ख्, ग्, घ्, ङ्
चॅ्, छॅ्, जॅ्, झॅ, (चार, छान, जेवण, झेप)
च्, छ्, ज्, झ् (चोर, उ (न्मा) छाह, जोग, झाप)
ट् ठ्, ड्, ढ्, ण, ण्ह्,
त्, थ्, द्, ध्, न्, न्ह्
प्, फ्, ब्, भ्, म्, म्ह,
य्, र्, ऱ्ह्, ल्, ल्ह, व्, व्ह्
श्, स्, ह्$^{१}$, ह्$^{२}$, ळ

मराठीतील या व्यंजनांच्या काही खास लक्षात घेण्यासारख्या बाबी कोणत्या आहेत त्या आता पाहू.

### १.३.७ मराठीतील व्यंजने

मराठीतील व्यंजनांच्या उच्चाराचे निरीक्षण केले म्हणजे खालील गोष्टी विशेषत्वाने जाणवतात.

(१) मराठीत 'च्' चे उच्चारण दोन प्रकारे होत असते. चहा, चमत्कार, चमेली, विचार, चिकित्सा, चिरणे, वाच (बोलण्याची क्रिया) चुंबन, चेला, चैन, चोक (बे चोक आठ) यांसारख्या शब्दांमध्ये 'च्' चे तालव्य उच्चारण होते. (तालव्य च् म्हणजेच चॅ्)

चरणे, चाफा, चुकणे, चुराडा, चूळ, त्याचे, चोर, वाचा (वाचण्याची कृती करा हा अर्थ) यांसारख्या शब्दांमध्ये 'च्' चे दंततालव्य किंवा दंतमूलीय उच्चारण होते. 'च्' चे या प्रकारचे उच्चारण हे मराठीचे खास वैशिष्ट्य होय.

(२) 'च्' प्रमाणेच छ्, ज्, झ् ही व्यंजनेही दोन प्रकारे उच्चारली जातात. उदाहरणार्थ (अ) पहिला प्रकार किंवा तालव्य उच्चारण : छत्री, छाप, छान, छे, छूमंतर, छानछोकी जग (विश्व हा अर्थ) जाम, समाज, विजार, जिनगर, जीव, जून (महिना) जेवण, मजेने, जैन, झक्क, झिंगणे, झेप, झेल

(३) दुसरा प्रकार किंवा दंतमूलीय उच्चारण : उत्साह(छा)ह, वत्स(छ)ल (या शब्दांचे लेखन 'त्स' असे केले तरी उच्चारण दंतमूलीय 'छ' असे होते.) जगणे, जा, जुगार, जू, माजणे, विजेरी, जोर, जोखीम,झगड, झरा, झाड, झूल, झोळी.

या दोन प्रकारच्या उच्चारणांना वेगळी लेखनचिन्हे नाहीत हे खरे ; पण मराठी माणसे स्वाभाविकपणे हे दोन प्रकारचे उच्चारण करत असतात.

(४) ञ् आणि ष् ही व्यंजने मराठीत मानण्याचे कारण नाही. 'य' चा अनुनासिक म्हणजे नाकाच्या मार्गाने उच्चार केला की तो ञ् असाच होतो. पोशाख-पोषारव, कोश-कोष, शौक-षौक असा मुद्दाम वेगळा उच्चार करता येईल ; पण स्वाभाविक बोलण्यात 'ष' चा उच्चार 'श' असाच होत असतो.

(५) ज्यांचा नाकावाटे उच्चार होतो अशी व्यंजने म्हणजे अनुनासिके मराठीत पुढीलप्रमाणे आहेत : ङ्, ण्, ण्ह्, न्, न्ह्, म्, म्ह्, यातील ण्ह्, न्ह्, म्ह्, ही लेखनात जोडाक्षरे वापरतात, पण ती स्वतंत्र व्यंजने आहेत. ण्, न्, म्, ही व्यंजने उच्चारताना हवा कमी प्रमाणात लागते तर ण्ह्, न्ह्, म्ह् या उच्चारणासाठी हवा अधिक प्रमाणात लागते. ङ् चे ह् युक्त म्हणजे 'ङ् ह्' असे उच्चारण करता येते, पण कोणत्याही शब्दामध्ये 'ङ्ह्' चा उपयोग होत नाही.

(६) मराठीत 'ह्' चा उच्चार दोन प्रकारे होतो. कःपदार्थ, मनःपूत, अधःपात हे उच्चारण करताना 'ह्' चा वेगळा उच्चार होतो.हा 'ह' स्वतंत्रपणे शब्दात येऊ शकत नाही. तो स्वराच्याबरोबरीने पण स्वरानंतरच येऊ शकतो. हात, हिरा, जाहीर, हेल, होय, हौस, अशा प्रकारे जो शब्दात स्वतंत्रपणे येऊ शकतो तो दुसऱ्या प्रकारचा 'ह' होय.ह$^{१}$ हा अघोष तर ह$^{२}$ हा घोष असतो.

(७) क्ष, ज्ञ यांना स्वतंत्र व्यंजन मानण्याचे कारण नाही क् + श् = क्ष्,द् + न् + य् = ज्ञ् असे हे संयुक्त उच्चारण आहे. लेखनामध्ये त्यांना स्वतंत्र चिन्हे असल्यामुळे ती स्वतंत्र व्यंजने आहेत असा चुकीचा समज होऊ शकतो.

(८) 'ळ' हे व्यंजन बरेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. शाला-शाळा ; माला-माळा ; यांसारख्या काही ठिकाणी ल आणि ळ मुळे अर्थात् फरक पडत नाही ; पण इतर अनेक ठिकाणी तो पडतो. उदा : ओल-ओळ, काल-काळ, शालू-शाळू, वेल-वेळ, खोल-खोळ, मला-मळा,. इ.

प्रत्येक भाषेत उच्चारणाची अशी खास वैशिष्ट्ये असतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(च) व्यंजन म्हणजे काय?

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

(छ) खालील ध्वनींपैकी कोणती व्यंजने आहेत?

| ठ्, | इ, | झ्, | ऑ, | ळ्, | क्, | स्, | उ, | ए, | ज, | इ् |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

(ज) उच्चारणातील फरक ओळखून खालील शब्दांची दोन गटांत विभागणी करा :
चाकू, चमत्कार, चळवळ, चर्चा, चोप, मेज, शेजारी, झाकणे, झकास, चंगळ, छबी, जमाव, मिजास, जनता, काही जण, झेब्रा, झोप, चुंबळ, चाफा, झगमगाट, चेंगट, झुंबड

| तालव्य उच्चारण | दंतमूलीय उच्चारण |
|---|---|
| | |

(झ) खालील व्यंजनांचा उपयोग करून शब्द लिहा :
द्, ध्, प्, ब्, म्, म्ह्, न्, न्ह्, र्, ळ्,
उदा, दगड

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

(ञ) खालील शब्दांत ज्यांच्या उच्चारणास हवा अधिक प्रमाणात लागते अशी व्यंजने कोणती ते ओळखा.
ठोसा, खाऊ, चढउतार, फुशारकी, उधार, उद्धार, भरमसाट, साठा, खणखणीत, म्हणजे, तान्हा, फास, बाभळ, खापर, कोल्हा, भरपाई, मळभ, फौज, थंड, छरा, झबले, थांबा, धागर, खोखो, अच्छा,

जसे-ठोसा मध्ये (ठ)

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

(ट) ज्यांच्या उच्चारणात हवा कमी प्रमाणात लागते अशी खालील शब्दांत कोणती व्यंजने आहेत?
जरूर, टणक, दणदणीत, वहीम, सासरा, धाप, निस्तेज, कःपदार्थ, दुःख, शंख, मनकवडा, चाकू.

जसे-जरूर मध्ये (र)

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

### १.३.८ व्यंजनांचे वर्गीकरण

उच्चारणस्थाने, उच्चारणप्रयत्न आणि उच्चारण अवयव अनेक असल्यामुळे व्यंजनांची संख्या स्वरांपेक्षा नेहमीच जास्त असते.

**उच्चारणस्थाने**

(१) ओठ, दात, वरच्या दातांचे मूळ (दंतमूल) मूर्धा, तालू, मृदुतालू (तालुपटाचा मागील भाग) कंठद्वार ही व्यंजनांची उच्चारणस्थाने होत.

(२) स्वरयंत्रात तंतूंचे कंपन होणे किंवा न होणे, (घोष किंवा अघोष) हवा कमी किंवा अधिक प्रमाणात वापरली जाणे (अल्पप्राण, महाप्राण) हवा किंचित अडवली जाणे (स्पर्श किंवा स्फोट) हवा घासली जाणे (घर्षण) जीभ वळविली जाऊन तिच्या दोन्ही बाजूनी हवा बाहेर पडणे (पार्श्विक व्यंजन) व्यंजन असूनही स्वरासारखा उपयोग होणे (अर्धस्वर) दाताच्या मुळाशी जिभेच्या टोकाचे कंपन होणे यांसारख्या अनेक प्रयत्नांमुळे विविध (कंपनयुक्त) व्यंजने उच्चारली जातात.

(३) सर्व व्यंजनांच्या उच्चारणात प्रमुख्याने जीभ हा अवयव वापरला जातो. ओठ, दात हे स्थिर अवयवही ओष्ठ्य व दंत्य उच्चारणात वापरले जातात. मुखमार्गाने हवा जाऊ दिल्यास मुख व्यंजने व नासिका मार्गाने हवा जाऊ दिल्यास अनुनासिक व्यंजने निर्माण होतात. हे नियंत्रणाचे काम पडजीभ हा अवयव करतो.

### १.३.९ उच्चारणस्थानानुसार वर्गीकरण

(i) **ओष्ठ्य** प, फ, ब, भ, म्, म्ह्
(दंतौष्ठ्य) व्, व्ह्

(ii) **दंत्य** त, थ, द, ध, न्, न्ह्,
**दंत्य कंपनयुक्त** र्, ऱ्ह,
**दंत्य पार्श्विक** **ल्**, ल्ह्,

(iii) दंतमूलीय च्, दंत्य संघर्षी स्, छ्, ज्, झ्,

(iv) **मूर्धन्य** - ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, ण्ह्,
**मूर्धन्य पार्श्विक** - ळ्
**मूर्धन्य संघर्षी** - ष् *

(v) **तालव्य**-च्, छ्, ज्, झ्
**तालव्य संघर्षी**-श्
**तालव्य अंतःस्थ**-य्

(vi) **मृदुतालव्य**-किंवा कंठय-क्, ख्, ग्, घ्, ङ्

(vii) **कंठद्वारीय अघोष**-ह्[१] (किंवा विसर्ग)

(i) **कंठद्वारीय घोष**-ह्[२] (शब्दात येणारा ह)

### १.३.१० प्रयत्नानुसार वर्गीकरण

(i) **स्पर्श व्यंजने** ( =हवा अल्प काळ अडवून सोडली जाते) प, फ़, ब, भ, म, म्ह, त, थ, द, ध, न, न्ह, ट, ठ, ड, ढ, ण, ण्ह, क, ख, ग, घ, ङ्

(i) **स्पर्शसंघर्षी व्यंजने** (हवा अडवून आणि घासून सोडली जाते)
च्, छ्, ज्, झ : चॅ, छॅ, जॅ, झॅ,

(iii) **संघर्षी व्यंजने** (हवा घासत बाहेर पडते)
श, ष *स

(iv) **पार्श्विक व्यंजने** (जिभेच्या दोन्ही बाजूने हवा बाहेर पडते)
ल, ल्ह, ळ, र, ऱ्ह

(v) **अर्ध स्वर** – य, व, व्ह

(vi) **महाप्राण** – ह[१], ह[२]

(या सर्व व्यंजनांचे अल्पप्राण – महाप्राण ; अघोष-घोष, मौखिक, अनुनासिक या कारणानेही वर्गीकरण करता येते.)

## मराठी व्यंजनांचे वर्गीकरण

| | उच्चारण स्थान | | ओष्ठ्य | | दंत्य | | दंतमूलीय | | मूर्धन्य | | तालव्य | | मृदुतालव्य (किंवा कंठ्य) | | कंठद्वारीय | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उच्चारणप्रयत्न | | अघोष | -घोष, | अघोष | घोष | अघोष | घोष | अघोष- | घोष | अघोष | 'घोष' | अघोष | घोष- | अघोष | (घोष |
| १) | स्पर्श | (अल्पप्राण, | प, | ब, | त्, | द्, | | | ट | ड्, | | | क्, | ग्, | | |
| | | महाप्राण) | फ्, | भ्. | थ् | ध्, | | | ठ्, | ढ्, | | | ख्, | घ्, | | |
| २) | स्पर्श अनुनासिक | अल्पप्राण | | म्. | | न्, | | | | ण्, | | | | ङ्, | | |
| | | महाप्राण | | म्ह | | न्ह्, | | | | ण्ह्, | | | | | | |
| ३) | स्पर्श संघर्षी | अल्पप्राण | | | | | च्, | ज, | | | 'चॅ' | जॅ, | | | | |
| | | महाप्राण | | | | | 'छ' | झ्, | | | छॅ, | झॅ | | | | |
| ४) | संघर्षी | महाप्राण | | | स्, | | | | ष* | | श् | | | | ह,[१] | 'ह'[२] |
| ५) | (कंपनयुक्त) | अल्पप्राण | | | | र्, | | | | | | | | | | |
| | | महाप्राण | | | | र्ह' | | | | | | | | | | |
| ६) | (पार्श्विक | अल्पप्राण | | | | | | ल्, | | ळ्, | | | | | | |
| | | महाप्राण | | | | | | ल्ह, | | | | | | | | |
| ७) | (अर्धस्वर) | अल्पप्राण | | | | व् | | | | | | 'य | | | | |
| | | महाप्राण | | | | व्ह | | | | | | | | | | |

दंतौष्ठ्य

* ष व्यंजन मराठीत आहे किंवा नाही या बद्दल, वाद आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ठ) व्यंजनाच्या वर्गीकरणाच्या संदर्भात खालील संज्ञा स्पष्ट करा. उदा. द्या.

१) अल्पप्राण

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

२) महाप्राण

..........................................................................................................
..........................................................................................................

३) अघोष

..........................................................................................................
..........................................................................................................

४) घोष

..........................................................................................................
..........................................................................................................

५) अनुनासिक

..........................................................................................................
..........................................................................................................

(ड) व्यंजने उच्चारली जाण्याची मुखातील स्थाने कोणती? उदा. कंठाचा प्रारंभ

..........................................................................................................
..........................................................................................................

(ढ) मराठीतील अर्धस्वर कोणते? त्यांचा उपयोग केलेले पाच शब्द लिहा

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

(ण) खालील शब्दांतील व्यंजनांची उच्चारण स्थाने ओळखा

| | |
|---|---|
| बेफाम | |
| तजवीज | |
| शिलेदार | |
| शंभर | |
| ठिकाण | |

(त) खालील शब्दांतील घोष व्यंजने ओळखा

| देव, | गदा, | कमान, | चक्र, | बकाल ; |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(थ) खालील शब्दांतील अघोष व्यंजने ओळखा

| कोरा, | मशाल | बडबड | पालखी | शेत |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(द) खालील शब्दांतील पार्श्विक व्यंजने ओळखा :

लसूण, विलास, लाळ, आळ, तलम, गुळगुळीत, चळवळ, लालेलाल, कळी, आबाळ

..........................................................................................................

# १.४ नमुना उत्तरे

(क) भाषेत वापरला जाणारा असा स्वावलंबी ध्वनी की ज्याच्या कसोट्या पुढीलप्रमाणे आहेत (अ) स्वराचा उच्चार अखंड, अप्रतिहत, आपल्या इच्छेनुसार कमी किंवा दीर्घ काळ करता येतो. (आ) स्वर हा घोष व अल्पप्राण ध्वनी असतो. (इ) स्वरांचे सहाय्य व्यंजनांच्या उच्चारणात होत असते.

(ख) मराठीत 'ऋ' हा स्वतंत्र स्वर मानण्याचे कारण नाही, कारण (अ) 'ऋ' स्वरत्वाच्या कसोट्यांना उतरत नाही (आ) 'ऋ' चा उच्चार प्रत्यक्षात रु किंवा रि यासारखा होतो.

(ग) गुहस्थ किंवा ग्रिहस्थ (क्वचित ग्रहस्थ), मात्रुकुपा किंवा मात्रुक्रिपा, ह्रिदय किंवा ऱ्हदय, क्रुष्ण किंवा क्रिष्ण, रुण किंवा रीण या प्रमाणे उच्चार होतो.

(घ) ज्यावेळी एकापेक्षा जास्त स्वरांचे एकत्रित उच्चारण केले जाते अशा एकत्रित उच्चारणास संयुक्त स्वर म्हटले जाते. ऐ (अ +इ) आणि औ (अ +उ) हे संयुक्त स्वर आहेत. अशा स्वरांना 'स्वतंत्र स्वर' मानण्याची गरज नाही. कारण तसे केल्यास सर्व संयुक्त व्यंजनांना स्वतंत्र व्यंजन मानावे लागेल आणि अं, आं, इं, उं, अः इः, उः इत्यादी ध्वनींनाही ध्वनिव्यवस्थेत स्वतंत्र स्थान द्यावे लागेल.

(ङ) त्या त्या भाषकांना सहजपणे उच्चारता येतात व ज्यांचे भाषेत उपयोजन होत असते अशा मूलभूत स्वरांना 'मानस्वर' असे म्हणतात मराठीत इ, ए, अ, ए, अॅ, आ, उ, ओ, ऑ, असे आठ मानस्वर आहेत.

(च) मुखभागात कोणत्याही प्रकारे अडथळा किंवा घर्षण होऊन बाहेर पडणारा आणि उच्चारणासाठी स्वरांचे साहाय्य आवश्यक असलेल्या ध्वनीस व्यंजन म्हणतात.

(छ) व्यंजने असलेलेले ध्वनी पुढीलप्रमाणे : ठ्, झ्, ळ्, क्, स्, न्, ड्, ध्वनिमार्गात अडथळा निर्माण झाल्याशिवाय आणि स्वरांचे साहाय्य घेतल्याशिवाय हे ध्वनी उच्चारता येत नाहीत म्हणून ही व्यंजने आहेत.

(ज)

| **तालव्य उच्चारण** | **दंतमूलीय उच्चारण** |
|---|---|
| चमत्कार, चर्चा, झकास, चंगळ, | चाकू, चळवळ, चोप, मेज, |
| छबी, मिजास, जनता, झेब्रा, | शेजारी, झाकणे, जमाव, |
| चेंगट | काहीजण, झोप, चुंबळ, चाफा |
| | झगमगाट, झुंबड. |

(झ) दिलेल्या व्यंजनांचा उपयोग करून लिहिलेले शब्द : दगड, धडाका, पश्चिम, बेडूक, मका, म्हणून, नक्की, तान्हा, विराम, ओळख.

(ञ) ज्यांच्या उच्चारणास हवा अधिक प्रमाणात लागते अशी म्हणजे महाप्राण व्यंजने :

ठोसा (ठ), खाऊ (ख) चढ (ढ), फुशारकी (फ), उधार (ध), उद्धार (ध), भरमसाट (भ), साठा (ठा), खणखणीत (ख), म्हणजे (म्ह), तान्हा (न्ह), फास (फ), बाभळ (भ), खापर (ख), कोल्हा (ल्ह), भरपाई (भ) मळभ (भ), फौज (फ), थंड (थ), छरा (छ), झबले (झ), थांबा (थ), घागर (घ), खोखो (ख), अच्छा (छ).

(ट) ज्यांच्या उच्चारणात हवा कमी प्रमाणात लागते अशी म्हणजे अल्पप्राण व्यंजने :

जरूर (र), टणक (ट, ण, क), दणदणीत (द, ण, त), वहीम (व, म), सासरा (र), धाप (प), निस्तेज (न, त, ज), कःपदार्थ (क, प, द, र) दुःख (द), शंख (ङ्) मनकवडा (म, न, क, व, ड), चाकू (क)

(ठ) संज्ञांचे सोदाहरण स्पष्टीकरण :

१. **अल्पप्राण** – ज्या व्यंजनाच्या उच्चारणासाठी हवा (किंवा प्राण) अल्पप्रमाणात वापरली जाते अशा व्यंजनास अल्पप्राण व्यंजन म्हणतात. उदा. : क्, ग्, ड्, म्.

२. **महाप्राण** : व्यंजन उच्चारणात हवा अधिक किंवा मोठया प्रमाणात वापरली जाते अशा व्यंजनास महाप्राण व्यंजन म्हणतात. उदा. ख्, घ्, ढ् म्ह.

३. **अघोष** : व्यंजन उच्चारणाच्या वेळी स्वरतंत्रीमध्ये हवेचे कंपन न झाल्यास जे उच्चारण होते त्यास अघोष म्हणतात. उदा : क्, ख्, च्, छ्, प, फ

४. **घोष** : व्यंजन (किंवा स्वरही) उच्चारणाच्या वेळी स्वरतंत्रीमध्ये हवेचे कंपन झाल्याने जे उच्चारण होते त्यास घोष म्हणतात. उदा. : ग्, घ्, ज्, झ्, ब्, भ्.

५. **अनुनासिक** : व्यंजन उच्चारणाच्या वेळी हवा बाहेर पडण्यासाठी नासिकामार्गाचा जेव्हा उपयोग केला जातो तेव्हा उच्चारल्या जाणाऱ्या ध्वनीस अनुनासिक म्हणतात. उदा. : ङ्, ण्, न्, न्ह, म्, म्ह.

(ड) व्यंजने उच्चारली जाण्याची मुखातील स्थाने अशी : कंठाचा प्रारंभ, मृदुतालू, तालू, मूर्धा, दाताचे मूळ, दात, ओठ.

(ढ) मराठीतील अर्धस्वर व त्यांचा उपयोग केलेल पाच शब्द : 'य' आणि 'व' हे मराठीतील अर्धस्वर आहेत. दोन स्वर जेव्हा निकट येतात तेव्हा त्यांचा सलग उच्चार करणे कठीण असते अशा वेळी अर्धस्वरांची योजना करून ते उच्चारण सोपे केले जाते.

उदा. : गाइले – गायिले ; पाउले – पावले, भाऊजी – भावजी, आए – आये, जाओ – जावो

(ण) दिलेल्या शब्दांतील व्यंजनांची उच्चारण स्थाने :–

ब्, फ्, म्, भ् – ही ओष्ठ्य व्यंजने (ओठांच्या ठिकाणी उच्चार)
त्, द्, र्, ल्, – ही दंत्य व्यंजने (दातांच्या ठिकाणी उच्चार)
व् – हे दंतौष्ठ्य व्यंजन (ओठ व दात मिळून उच्चार)
ज् – हे दंतमूलीय व्यंजन (वरच्या दाताच्या मुळाशी उच्चार)
ठ्, ण् – ही मूर्धन्य व्यंजने (मूर्धेच्या ठिकाणी उच्चार)

(त) दिलेल्या शब्दांतील घोष व्यंजने याप्रमाणे :
द्, व्, ग्, म्, न्, र्, ब्, ल्.
(या शब्दांमध्ये क्, च्, ही व्यंजने अघोष आहेत)

(थ) दिलेल्या शब्दांतील अघोष व्यंजने याप्रमाणे :
क्, श्, प्, ख्, त्
(या शब्दांमधील र्, म्, ल्, ब्, ड्, ही व्यंजने घोष आहेत)

(द) दिलेल्या शब्दांमधील पार्श्विक व्यंजने :
ल् आणि ळ् ही दोनच व्यंजने पार्श्विक आहेत.

## १.९ अधिक अध्ययन

(अ) व्यंजननिर्मिती मधील अवयवांचे कार्य

**स्वरयंत्र** : श्वासनलिकेत कंठाच्या जागी असलेल्या पोकळीत बारीक तंतूंनी बनलेला व खोबणीत बसवलेला जो अवयव आहे त्यास स्वरयंत्र म्हणात. फुफ्फसातील हवा श्वास नलिकेतून या स्वरयंत्राच्या द्वारा घशापर्यन्त जाते व तेथून मुखाच्या किंवा नाकाच्या पोकळीवाटे बाहेर पडते. **पडजीभ** : तालुपटाचा घशाच्या बाजूला निमुळता होत गेलेला लोंबता भाग म्हणजे पडजीभ. पडजिभेजी हालचाल अतिशय लवचिकपणे होत असते. तिच्या साह्याने नाकाच्या पोकळीकडे जाणारी हवा रोखता येते, त्याचप्रमाणे तोंडाच्या पोकळीतून जाणाऱ्या हवेचा मार्ग तात्पुरता बंद करून, हवा नाकाच्या पोकळीवाटे जाऊ दिली जाते. अशा वेळी अनुनासिक व्यंजनांचे उच्चारण होऊ शकते. जेव्हा पडजीभ स्वाभाविक लोंबत्या स्थितीत असते तेव्हा हवा दोन्ही पोकळयांमधून जाऊ शकते. सानुनासिक उच्चारण होणे न होणे किंवा किंचित प्रमाणात होणे यावर पडजिभेचेच नियंत्रण असते.

**जीभ** : मुखाच्या पोकळीत खालच्या बाजूस असलेला घशाकडे निमुळता होत गेलेला मांसल तुकडा म्हणेज जीभ होय. पचनसंस्थेच्या दृष्टीने जिभेचे काम पदार्थाची चव घेणे, अन्नग्रहण करून त्याचा घास अन्ननलिकेकडे पाठविण्याचे काम करणे, लाळपिंडावाटे निर्माण होणारी लाळ मिसळून चर्वणेचे कार्य सुलभ करणे हे आहे. हे मुख्य काम चालू असताना ध्वनिनिर्मितीच्या कार्यास जीभ विशेष मदत करू शकत नाही. त्यामुळेच खाता किंवा पिताना एकतर नीट बोलता येत नाही किंवा बोलण्याचा प्रयत्न केल्यास, श्वासनलिकेत अन्नाचा कण किंवा पाण्याचा थेंब जाताच जोराचा ठसका लागतो. खाण्यापिण्याच्या क्रियेखेरीज इतर वेळी मात्र जीभ मुख्यतः ध्वनिनिर्मितीच्या दृष्टीने सतत विविध हालचाली करीत असते कंठाच्या प्रारंभापासून वरच्या दाताच्या मुळापर्यन्त कोणत्याही ठिकाणी जीभ उचलली जाते, तालुपटाला टेकवली जाते, अत्यंत अरुंद फट राहील व त्यामुळे हवा घासलच बाहेर पडेल अशा स्थितीत जीभ आणली जाते, जिभेचे पुढील टोक उचलून मागच्या दिशेने वळविता येते. हवा किंचितकाल अडवून एकदम ती सोडणे, हवा घासत बाहेर पडेल अशी स्थिती निर्माण करणे, हवा अडविण्याची आणि घासण्याची क्रिया एकाच वेळी होईल अशी जिभेची स्थिती बनविणे, हवा जिभेच्या दोन्ही बाजूंच्या फटीतून जाईल अशी स्थिती निर्माण करणे या आणि यांसारख्या विविध हालचाली अतिशय द्रुतगतीने जीभ करत असते म्हणून तर आपणांस एकापाठोपाठ वेगवेगळी व्यंजने उच्चारता येतात. स्वरनिर्मितीच्या वेळी जिभेकडून हवेला कुठेही अडथळा होत नाही, पण जिभेच्या हालचालीमुळे तोंडच्या पोकळीत हवेला ठिकठिकाणी वळण व दिशा दिली जाते. म्हणून तर अनेक स्वर आपण उच्चारू शकतो. बोलण्याच्या क्रियेतले जिभेचे कार्य अनन्यसाधारण असे महत्त्वाचे असल्यामुळेच भाषा या अर्थाने पुष्कळदा जीभ हाच शब्द वापरला जातो. उदा. : फारसी, 'जबान', इंग्रजी Tongoue इ. मराठीतही 'जीभ जड असणे' म्हणजे उच्चार नीट करता न येणे हा वाक्प्रचार रूढ आहेच.

**दात** : मुखाच्या पोकळीत पुढील बाजूस वरच्या व खालच्या बाजूस बसविलेला विशिष्ट प्रकारच्या हाडांनी बनलेला अवयव म्हणजे दात. मुखाच्या पोकळीस आधार आणि संरक्षण तसेच चेहऱ्यास आकार दातांमुळे प्राप्त होतो. चावणे, तोडणे, रगडणे, घर्षण करणे, आणि या प्रकारे अन्नसेवनास मदत करणे हे दातांचे मुख्य कार्य आहे. पण दंत्य आणि

दंतमूलीय व्यंजने निर्माण करताना जिभेस दातांची मदत होत असते. ध्वनिनिर्मितीत खालच्या दातांपेक्षा वरच्या दातांचे कार्य अधिक महत्त्वाचे असते. दात पडल्यास दंत्य व्यंजने सुस्पष्टपणे उच्चारली जात नाहीत. **ओठ** : दातांना बाहेरून संरक्षण देणारा, तोंडाच्या पोकळीचा वरचा व खालचा मांसयुक्त अवयव म्हणजे ओठ होय. चोखणे, शोषणे. ही ओठांची क्रिया अन्नग्रहणात साहाय्यभूत होत असते. मुखाचा खालचा भाग जबडयाच्या सांध्यामुळे वर उचलता येतो त्यामुळे खालचा ओठ वरच्या ओठास भिडविता येतो व त्यामुळे हवा अडविता येते. जेव्हा ध्वनिनिर्मितीमध्ये केवळ ओठांनी हवा अडविली व सोडली जाते तेव्हा ओष्ठ्य व्यंजने उच्चारली जातात. वरचा दात व खालचा ओठ यांच्या संयुक्त हालचालीतून दंतौष्ठ्य व्यंजने (व्‌ व्ह्‌) उच्चारता येतात. स्वरनिर्मितीच्या वेळी ही ओठांकडे विशिष्ट काम असते. ओठांचा चंबूसारखा आकार केला जातो, ओठ आडवे ताणले जातात त्याप्रमाणे ओठ ताणून जास्तीत जास्त तोंड उघडले जाते. ओठांच्या या विविध रचनांमुळे विविध स्वर उच्चारले जातात.

**खालील आकृतीत वागिंद्रिये दर्शविली आहेत. त्या आकृतीचे अध्ययन करा.**

१. वरचा ओठ
२. खालचा ओठ
३. वरचे दात
४. खालचे दात
५. दंतमूल
६. अग्रतालू
७. मध्यतालू
८. मृदुतालू
९. अलिजिव्हा (पडजीभ)
१०. गलभित्तिका (घसा)
११. जिव्हाग्र
१२. जिव्हाफलक
१३. उपजिव्हा
१४. आभासी स्वरतंत्री
१५. स्वरतंत्री पोकळी
१६. स्वरतंत्री
१७. श्वासनलिका
१८. अन्नमार्ग
१९. मुखविवर
२०. नासिकाविवर



## १.६ सारांश

मराठी ही भारतीय भाषांपैकी एक प्रमुख भाषा असून गेल्या हजार वर्षांच्या तिच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. तिच्या अनेकविध बोली आहेत. मराठीचा अनेक बाबतींत विकास झाला असला तरी पुष्कळ बाबतींत तिची प्रगती अजून व्हायची आहे.

प्रत्येक भाषेप्रमाणे मराठीचीही ध्वनिव्यवस्था स्वतंत्र असून तिची अनेक वैशिष्टये आहेत. इ, ए, अॅ, अ, आ, उ, ओ, ऑ हे मराठीचे आठ मान स्वर आहेत. ऋ चे मराठीतील स्थान विवाद्य आहे. मराठीत संयुक्त स्वर मानण्याचे कारण नाही. उच्चारण स्थान व ओठांची स्थिती यावरून स्वरांचे वर्गीकरण करता येते.

वर्तमान मराठीत ४३ व्यंजने असून काही रूढ व्यंजनांना त्यात स्थान देण्याचे कारण नाही तर काही व्यंजने नव्याने स्वीकारली पाहिजेत. 'य' वर्गाचे तालव्य उच्चारण मराठीत होतेच, पण दंतमूलीय 'च' वर्गीय व्यंजने हे मराठीचे खास वेगळेपण होय. उच्चारणस्थान, उच्चारणअवयव आणि उच्चारणप्रयत्न यांच्या आधारे व्यंजनांचे वर्गीकरण तसेच मौखिक अनुनासिक या भेदांना मराठीत अर्थदृष्टया महत्त्व आहे. पार्श्विक 'ळ' हेही काही भाषांपेक्षा मराठीचे वैशिष्टय होय. य्, व्, आणि व्ह् हे मराठीतील अर्धस्वर आहेत. स्वरयंत्र, पडजीभ, जीभ, दात आणि ओठ या सर्व अवयवांना उच्चारणदृष्टया विशेष महत्त्व आहे.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

(१) आजच्या काळात मराठीचा संबंध कोणकोणत्या भाषांशी येतो? का?

(२) स्वर आणि व्यंजन यांमधील फरक उदाहरणे देऊन सांगा.

(३) स्वरांचे उच्चारणस्थान दाखविणारी आकृती काढून खाली दिलेल्या स्वरांच्या उच्चारणाची स्थाने दाखवा : ओ, ए, ॲ, ऋ

(४) च्, ज्, झ्, यांचे उच्चार वेगवेगळया शब्दांमध्ये कसे वेगळे होतात ते दाखविणारे दहा शब्द लिहा.

(५) अनुनासिक व्यंजनांचा उपयोग केलेले पाच शब्द लिहा.

(६) अल्पप्राण आणि महाप्राण व्यंजन यातील फरक उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

(७) खालील व्यंजने उच्चारताना कोणत्या प्रकारचा प्रयत्न केला जातो ते सांगा :

भ्, स्, ऱ्, द्, ठ्.

(८) बोलण्याच्या क्रियेमधील जिभेचे महत्त्व स्पष्ट करा.

(९) अघोष व्यंजन म्हणजे काय ते सांगून त्याची पाच उदाहरणे द्या.

(१०) संघर्षी व्यंजनांचे विशेष कोणते ते सांगा.

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) अभिनव भाषा-विज्ञान - डॉ. गं. ना. जोगळेकर
२) मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप - डॉ. सुहासिनी लद्दू.
३) अर्वाचीन मराठी - डॉ. रमेश धोंगडे
४) भाषाविज्ञान - परिचय– डॉ. मालशे, डॉ. पुंडे, डॉ. सोमण

टिप्पणी